# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
## पशु वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर
## कृषि विज्ञान केंद्र, दूधबर्डी, जि. नागपूर
## अंतर्गत विविध पदांसाठी जाहिरात

जा.क्र. /नापवैम/ केव्हीके / 348 /२०२२ दिनांक: 12/04 /२०२२

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, **दूधबर्डी, जि. नागपूर** येथे विविध पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात, कंत्राटी तत्त्वावर 11 महिने कालावधीकरिता भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**पदनिहाय शैक्षणिक अहर्ता /पदसंख्या/ दरमहा एकत्रित परिश्रमिक**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | दरमहा एकत्रित परीश्रमिक रुपये | किमान शैक्षणिक अहर्ता |
|---|---|---|---|---|
| १. | लघुलेखक श्रेणी - III | ०१ | २५,५००/- | १. मान्यताप्राप्त शैक्षणिक मंडळाची इयत्ता १२ वी उत्तीर्ण<br>२. उमेदवाराला इंग्रजी व मराठी लघुलेखनाची ८० शब्द प्रतिमिनिट या दराने १० मिनिटांची परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. तसेच उमेदवाराने इंग्रजी मधुन ५० मिनिटांमध्ये तर मराठी मध्ये ६५ मिनिटांमध्ये संगणकावर लिप्यंतर करणे अनिवार्य राहील. |
| २. | वाहन चालक | ०२ | २१,७००/- | १. मान्यताप्राप्त शैक्षणिक मंडळाची इयत्ता 10 वी उत्तीर्ण<br>२. जड आणि हलके वाहन चालविण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा वैध परवाना<br>**इष्ट पात्रता**<br>३. मान्यताप्राप्त शैक्षणिक प्रशिक्षण संस्थेचे संबंधित विषयाचे एक वर्ष कलावधीचे प्रमाणपत्र (Trade Certificate) यांना प्राधान्य दिले जाईल.<br>४. मान्यताप्राप्त संस्थेमध्ये वाहन चालविण्याचा अनुभव<br>५. वाहन यंत्रिकी कामाचा अनुभव<br>६. जड तसेच हलके दोन्हीही वाहन चालविण्याचा वैध परवाना असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. |

## अटी व शर्ती आणि उमेदवारांसाठी सुचना

1. सदर पदी निवड तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर 11 महिने कालावधीकरिता किंवा नियमित पदभरती द्वारे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत जे आधी घडेल तेवढ्या कालावधी पुरतेच भरण्यात येतील. सदरची निवड म्हणजे नियमित नियुक्ती नाही.
2. नियुक्ती आदेश दिलेल्या कालावधीनंतर उमेदवारांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.
3. सदर पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना कृषी विज्ञान केंद्रातील सेवेमध्ये तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या सेवेमध्ये कायम होण्याचा कुठलाही अधिकार राहणार नाही.
4. सदर पदांकरिता वयाची कमाल मर्यादा 45 वर्षापर्यंत राहील.
5. उमेदवारास अर्ज करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.
6. जाहिरातीतील अनु. क्र. 1. पदांकरिता संगणक ज्ञान असणे आवश्यक असून शासन मान्यताप्राप्त MC- CIT किंवा समकक्ष संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
7. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
8. तांत्रिक पदे व इतर पदांकरीता अर्जाचा वेगवेगळा नमुना असून उमेदवाराने योग्य त्या नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
9. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रती जोडून अर्जावर स्वतःला पासपोर्ट साईज फोटो विविध ठिकाणी चिटकवणे आवश्यक आहे.
10. सदर अर्ज सिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक असून लिफाफ्यावर **"कृषी विज्ञान केंद्र, दूधबर्डी, जि. नागपूर येथील_________ या पदाकरिता अर्ज"** असे स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.
11. परिपूर्ण भरलेला अर्ज **"सहयोगी अधिष्ठाता नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,** सेमिनरी हिल्स; **नागपूर पिन कोड 400006"** या पत्त्यावर दिनांक 31/05/22 **रोजी सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत** पोहोचणे **आवश्यक आहे.**
12. **विहित तारखेनंतर आलेल्या अर्जाचा स्वीकार करण्यात येणार नाही.**
13. उमेदवाराने शैक्षणिक अहर्ता,वय, अनुभव इत्यादी बाबत चे पुरावे / प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहेत तसेच सर्व आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती मुलाखतीदरम्यान सादर करणे आवश्यक आहे व अर्ज भरताना

अर्जसोबत जोडलेल्या कागदपत्राचा अनुक्रमांक अर्जामध्ये नमूद करावा.

14. नोकरीत असणाऱ्या उमेदवाराने संबंधित नियुक्त यांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

15. अधिक प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवाराच्या पूर्वानुभव भावाच्या गुणांच्या आधारे प्रत्येक पदासाठी केवळ 5 उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**16. उमेदवारास मुलाखतीकरिता उपस्थित राहण्यासाठी प्रवास अथवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

17. सर्व पदे ही पूर्णवेळ असून कार्यालयात नियमित उपस्थिती अनिवार्य आहे.

18. कोणतेही कारण न देता उमेदवाराचा अर्ज रद्द करण्याचा अधिकार निवड समितीस असेल.

19. अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा शासकीय अथवा राजकीय दबाव आणल्यास सादर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

20. सदरील जाहिरातीमधील पदांची संख्या मजकूर बदलणे इत्यादी बदल अथवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता यांना आहे.

**सहयोगी अधिष्ठाता**
**नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,**
**नागपूर**